
**सेंद्रीय (ऑरगॅनिक) शेतीची गरज**

रासायनिक खते, कीटकनाशकांशिवाय शेती ही संकल्पनाच शेतकऱ्यांना सहजरीत्या मान्य होत नाही. सेंद्रीय शेती असो किंवा नैसर्गिक शेती, या पद्धतीच्या वापराविषयी अनेक समज-गैरसमज आधीपासूनच पसरलेले. सेंद्रीय शेतीविषयी अजूनही शेतकऱ्यांपर्यंत व्यवस्थित माहिती पोहोचत नाही. या शेतीचा प्रयोग करणारा शेतकरी एकदा जरी अपयशी ठरला की, त्याची चर्चा झपाटय़ाने पसरते. उत्सुक शेतकऱ्यांमध्येही नैराश्य येते. भारतात रासायनिक खते, कीड व रोगनाशके, तणनाशके यांच्या वापराकडे अधिक लक्ष दिले गेले. हेक्टरी उत्पादकता वाढल्याचे पाहून बहुतांश शेतकऱ्यांनी रासायनिक शेतीकडे कल दर्शवला. पण, आता त्याचे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अनिर्बध वापरामुळे मृदा आरोग्य बिघडले आहे. पिकांसाठी आवश्यक सूक्ष्म जिवाणू नष्ट होत चालले आहेत. उत्पादकतेवरही परिणाम होऊ लागला आहे. विषारी औषधाची फवारणी केल्याने मित्र कीड, मित्र बुरशी मोठय़ा प्रमाणावर नष्ट होते आणि निसर्गाचे संतुलन बिघडते. विषारी कीटकनाशकांची प्रमाणाबाहेर फवारणी केल्यास काय दुष्परिणाम होतात, हे आता शेतकऱ्यांच्याही लक्षात येऊ लागले आहे. अलीकडच्या काळात शेतकऱ्यांमध्ये जागरूकता वाढू लागली आहे. शेती सुधारणांकडे शेतकरी लक्ष देऊ लागले आहेत.

रासायनिक शेतीला प्रभावी, उपयुक्त व फायदेशीर पर्याय सेंद्रीय शेती हा आहे. भारतात सेंद्रीय शेती अलीकडच्या काळात अधिक चांगल्या पद्धतीने विकसित होऊ लागली आहे. सेंद्रीय शेतीमध्ये कंपोस्ट, जैविक खत, जैविक कीटकनाशक, वृक्षलेप, मिश्र पीक, गांडूळ खत, जैविक औषधे, आच्छादन, पंचगव्य, दशपर्णी, शेण, गोमूत्र इत्यादीचा योग्य पद्धतीने योग्य वेळी वापर केला जातो. ग्रीनव्हेंशन बायोटेक या कंपनीने संशोधन करून आपल्या शेतमालाचे उत्पन्न वाढवण्यासाठी खालील ऑरगॅनिक उत्पादने विकसित केली आहेत.

## शक्तिवान (उपज वर्धक)




- शक्तिवान हे नैसर्गिक तत्वा पासून निर्मित मिश्रण असून, वनस्पती उत्पादन वाढीसाठी प्रभावकारी आहे.
- प्रकाश-संश्लेशन कार्यक्षमता वाढवते व झाडाची / रोपांची प्रजनन क्षमता वाढवते.
- नविन फांद्या, फुले, फळे यांच्या प्रमाणात वाढ होते.
- कळ्यांची आणि पानांची गळती थांबते, कळ्यांची फुलण्याची क्षमता वाढते.
- नविन अंकुरांचा विकास वाढतो, फळांची गळती थांबून फळांचा सरासरी आकार वाढतो.
- मुळांची वाढ उत्तमप्रकारे होते, मुळांची लांबी आणि रोपांची उंची वाढते.
- रोपट्यांना / झाडांना पोषणतत्वे जास्त प्रमाणात मिळते.
- रोपांची परिपक्वता होण्यास सहाय्यक आहे.

**१ मिली शक्तिवान १ लिटर पाण्यात मिसळून खालीलप्रमाणे फवारणी करावी.**

| क्र. | पिकांची नावे | पहिली फवारणी | १ ली व २ री फवारणी अंतर | २ री व ३ री फवारणी अंतर |
|---|---|---|---|---|
| १) | धान्य :- तांदूळ, बाजरा, गहूं , मक्का, चारा | पेरणीच्या ३ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर |
| २) | डाळ :- लाल चना व अन्य डाळी | पेरणीच्या ३ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर |
| ३) | तेलबिया :- शेंगदाणे,सोयाबीन,सरसो, एरंडी, सुर्यफुल | पेरणीच्या आठवड्या आधी व फुले येण्याआधी | २ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर |
| ४) | कापडी :- कापूस, ताग | पेरणीच्या ५ आठवड्या नंतर | 3 आठवड्या नंतर | 3 आठवड्या नंतर |
| ५) | भाजीपाला :- वांगी, कांदा, लहसून, फुलकोबी, पत्ताकोबी, भेंडी, मिर्ची, काकडी, व अन्य | पेरणीच्या ३ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर | २ आठवड्या नंतर |
| ६) | फळ :- आंबा, द्राक्ष, केळी, ऊस | पेरणीच्या काही दिवसा नंतर | 3 आठवड्या नंतर | 3 आठवड्या नंतर |

# किटोगोल्ड

(बुरशीनाशक व प्रतिकारक्षमता वर्धक)

किटोगोल्ड या नैसर्गिक तत्त्वापासून बनवलेल्या मिश्रणामधील कायटोसॅन घटकामुळे वनस्पतीची प्रतिकारक्षमता वाढते. तसेच यातील वनस्पतीजन्य तेलांमुळे बुरशी आणि जिवाणू मुळे होणाऱ्या रोगांपासून संरक्षण मिळते. यामुळे वनस्पतीचे उत्पादन वाढण्यास मदत होते. चूर्णा सारख्या मऊ बुरशीने झाकणे, झाडाचे वाकणे, सडणे, कोड लागणे, करपणे, या सर्व समस्यावर किटोगोल्ड उपयुक्त आहे. कीटोगोल्ड वेगवेगळी फळे (द्राक्ष, डाळिंब वगैरे), फळभाज्या, धान्य, डाळी व इतर पिकांसाठी लाभदायक आहे.




१ मिली कीटोगोल्ड १ लिटर पाण्यात मिसळून दर १०-१५ दिवसांनी छाटणीपर्यंत फवारावे.